# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

निष्काम जन सेवार्थ समर्पिता

## दिनांक ०६-०९-२०१६ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक-२७) रोजी संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

मंगळवार दिनांक ०६ सप्टेंबर २०१६ रोजी ( का.प.क्र .२७ ) मा.महापौर श्री. त्र्यंबक गणपतराव तुपे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी ११-०५ वा वंदेमातरम् या गीताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.ओम प्रकाश बकोरीया,आयएएस नगर सचिव, श्री.दिलीप सुर्यवंशी व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

१. स.स. श्री. प्रमोद प्रल्हाद राठोड
२. स.स. श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
३. स.स. श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव
४. स.स. श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी
५. स.स. श्री.जाधव बन्सी ग्यानू
६. स.स. श्री.वाघमारे रुपचंद लक्ष्मण
७. स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग
८. स.स. श्री.राजगौरव हरिदास वानखेडे
९. स.स. सौ.रोजतकर पुष्पा उत्तमराव
१०. स.स. श्री.विजय साईनाथ औताडे
११. स.स. श्री.सुरे सीताराम इसराम
१२. स.स. सौ.स्वाती किशोर नागरे
१३. स.स.श्री.सचिन सुर्यकांत खैरे
१४. स.स. श्री.रावसाहेब राधाकिसन आमले
१५. स.स. श्रीमती लोखंडे मनिषा विनोद
१६. स.स. श्री.अफसर खॉन यासीन खॉ
१७. स.स. श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद
१८. स.स. श्री.सय्यद मतीन रशीद
१९. स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल
२०. स.स. श्रीमती सय्यद सरवतबेगम आरेफ हुसैनी
२१. स.स. श्रीमती शेख नरगीस सलिम
२२. स.स. श्रीमती खरात सिमा गणपत
२३. स.स. सौ.शोभा नारायणराव वळसे
२४. स.स. श्री.चित्ते नितीन रमन
२५. स.स. सौ.ज्योती सुभाष पिंजरकर
२६. स.स. श्रीमती सोनवणे भारती महेंद्र
२७. स.स. श्रीमती शबनम बेगम कलीम कुरेशी

२८. स.स. श्री.मलके गोकुलसिंग संपतसिंग
२९. स.स. श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप
३०. स.स. श्रीमती वैशाली कारभारी जाधव
३१. स.स. श्री.शिंदे राजु रामराव
३२. स.स. श्रीमती खरत सुरेखा गौतम
३३. स.स. श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी
३४. स.स. श्री.खान इरशाद इब्राहिम
३५. स.स. श्रीमती नसीम बी सांडु खॉ
३६. स.स. श्री.अजीम अहेमद रफीक
३७. स.स. श्रीमती खतीजा कुरैशी छोटू कुरैशी
३८. स.स. श्री.खान फेरोज मोईनुद्दीन
३९. स.स. कु.यशश्री लक्ष्मीनारायन बाखरीया
४०. स.स. श्री.तनवाणी राजु लेखराज
४१. स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव
४२. स.स. श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखॉ
४३. स.स. श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे
४४. स.स. श्रीमती चावरीया बबीता विजय
४५. स.स. श्री.भादवे रामेश्वर बाबुराव
४६. स.स. श्री.बल्लाळ मनोज आसाराम
४७. स.स. श्रीमती मलेका बेगम हबीब कुरैशी
४८. स.स. श्रीमती पठाण अस्मा फिरदोस रफीक पठाण
४९. स.स. श्री.जायभाय रमेश भानुदास
५०. स.स. श्री.शेख जफर अखतर
५१. स.स. श्रीमती गादगे शितल विरभद्र
५२. स.स. श्री.दांडगे शिवाजी भाऊसाहेब
५३. स.स. श्रीमती देसरडा राखी प्रशांत
५४. स.स. श्रीमती भालेराव आशा नरेश
५५. स.स. श्री.खैरे ऋषिकेश चंद्रकांत
५६. स.स. श्रीमती रेशमा अशफाक कुरेशी
५७. स.स. श्री.बारवाल गजानन रामकिसन
५८. स.स. श्रीमती बोर्डे सरीता अरुण
५९. स.स. श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागर
६०. स.स. श्रीमती बनकर विजया संजय
६१. स.स. श्री.साळवी नितीन दशरथ
६२. स.स. श्रीमती विधाते अंकिता अनिल
६३. स.स. श्रीमती कुलकर्णी जयश्री सुरेंद्र
६४. स.स. श्री.मनगटे गजानन भानुदास
६५. स.स. श्रीमती देशमुख माधुरी मिलींद
६६. स.स. श्रीमती सत्यभामा दामु अण्णा शिंदे

६७. स.स. श्री.जगताप भाऊसाहेब उत्तमराव
६८. स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव
६९. स.स. श्री. भगवान (बापु) देविदास घडमोडे
७०. स.स. श्री.गांगवे मनोज बन्सीलाल
७१. स.स. श्री.सोहेल शकील शेख
७२. स.स. श्रीमती ज्योती सुनिल नाडे
७३. स.स. श्रीमती मुंढे मनिषा बाळासाहेब
७४. स.स. श्रीमती मिना रामदास गायके
७५. स.स. श्री.पवार आत्माराम माणिकराव
७६. स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम
७७. स.स. श्रीमती विमल गोविंद केंद्रे
७८. स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल
७९. स.स.श्री.थोरात दिलीप गंगाधर
८०. स.स. श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ
८१. स.स. श्रीमती सुमित्रा गिरीजाराम हाळनोर
८२. स.स. श्रीमती निकाळजे लता मगन
८३. स.स. श्री.सोनवणे राहुल पंढरीनाथ
८४. स.स. श्री.सिद्धांत संजय शिरसाट
८५. स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद
८६. स.स. श्रीमती विमल जनार्धन कांबळे
८७. स.स. श्री.घोडेले नंदकुमार राधाकिसन
८८. स.स. श्रीमती मुल्ला सलीमा बेगम खाजोददीन
८९. स.स. श्रीमती शोभा गरुलिंगअप्पा बुरांडे
९०. स.स. श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे
९१. स.स. श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
९२. स.स. श्री.अप्पासाहेब विनायक हिवाळे
९३. स.स.कु.जमादार सायली भागवत

**<u>नामनिर्देशित पालिका सदस्यांची नावे</u>**

१. श्री.घोडके कचरु छगनराव
२. श्रीमती आऊलवार सुनिता तुकाराम
३. श्री.चंदु किशनचंद तनवाणी

श्री.दिलीप थोरात :माजी आमदार श्री.श्रीकांत जोशी यांचे वडील स्व.अनंतराव जोशी यांचे नुकतेच निधन झाले ते शिक्षक व त्यानंतर उपशिक्षणाधिकारी पदावर निवृत्त झालेले होते.त्यांना श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.राजेंद्र जंजाळ :कर्तव्य बजावत असतांना पोलीस शिपाई स्व.विलास शिंदे यांना प्राण गमवावे लागते श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.भगवान घडमोडे :बी बी शिंदे एमपीएससीचे अध्यक्ष होते शिक्षण क्षेत्रात त्यांनी चांगले काम केलेले आहे त्यांचेही निधन झाले श्रध्दांजली वाहण्यात यावी.

मा.महापौर :ठिक आहे सर्वानी श्रध्दाजंली अर्पण करण्यासाठी उभे रहावे.

या वेळी स्व.अनंतराव जोशी स्व.विलास शिंदे तसेच बी बी शिंदे यांना सभागृहाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

श्री.गजानन बारवाल :शोक संदेश त्यांचे कुटूंबीया पर्यत पाठविण्यात यावा.

मा.महापौर :नगर सचिव यांनी नोंद घ्यावी.

**<u>विषय क्रमांक ५७४:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहरातील रस्त्यांची दुरावस्था, खड्डे, अतिक्रमण, विद्युत व्यवस्था,पाणीपुरवठा व कर वसुली या विषयांच्या संदर्भाने विचार विनिमय करुन निर्णय घेणे बाबत.

**सुचक:-** श्री.राजगौरव वानखेडे,श्री.गजानन मनगटे.

**अनुमोदक:-** श्री.मकरंद कुलकर्णी,श्री.जगताप कमलाकर.

श्री.राजेंद्र जंजाळ :सोशल मिडीयाच्या माध्यमातून खड्डेच्या बाबतीत बातम्या येत आहे कुणी अंदोलन तर कुणी खड्डेत बेसरमाचे झाड लावता,तर रस्त्यावर होमहवम करीत आहे.खड्डेचे संवर्धन महापालिका करते की काय वॉटसाप व मॅसेज येत आहे, वर्षभर खड्डे बुजविण्याकरीता डांबर प्लॅन घेणार होते ते थांबविण्यात आले गणपती उत्सव सुरू झाला खड्डे बाबत वाईट घोषणा लोक देत होते. काम कामे का होत नाही जबाबदार कोण काम न करण्याचे षडयंत्र प्रशासनाकडून सुरू झाले काय अनेक समस्यामूळे त्रास नागरीकांना सहन करावा. योग्य निर्णय आज करावा.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर:रोहीणीगनर येथील अतिक्रमाणाची संचिका त्यात पीआर कार्ड व डुप्लीकेट पेपर तयार केलेले होते ती गहाळ झाल्याचे सांगतात सापडत नाही याचा अर्थ यात भ्रष्ट्राचार झाला काय तसे असेल तर संबधीतावर गुन्हे दाखल करावे.तेथील जागा भुमाफियांनी बळकावली कुणीही लक्ष देत नाही.जागा ताब्यात घेत नाही.

श्री.राजेंद्र जंजाळ :मनपाच्या जागेची संचिका सापडत नाही शोधून देतो असे सांगण्यात आले. असे होत असेल तर योग्य नाही सभा संपण्यापुर्वी ती संचिका मागवावी.

मा.महापौर :सभा संपण्यापूर्वी संबधीत अधिकारी यांनी संचिका सादर करावी.

श्री.रावसाहेब आमले :येथे चर्चा होते कार्यवाही होत नाही प्रशासन मालक म्हणून वागत आहे.पडेगाव मिटमिटा भागात खड्डे पडले गॅस गोडावून जवळ डिलेवरी पेशंन्ट येत असतांना रिक्षा पलटी झाला त्या अपघातात बांळ दगावले खड्डे बुजविण्याकडे दुर्लक्ष होते. गणपती आगमनापर्यत खड्डे बुजविणार होते कुठेच मूरूम टाकला नाही. अधिकारी काम करीत नसेल तर कार्यवाही करावी.

श्रीमती मनीषा मुंढे :हे ऐतिहासिक शहर आहे खड्डे बुजविले जात नाही गणपती उत्सव सुरू झाला वार्डातील नागरीक खड्डे बुजवितात शरमेची बाब आहे,माझ्या वार्डातून १५ वार्डतील गणपती विसर्जनसाठी जातात.तो रस्ता खराब झाला वेळीच दखल घ्यावी.

श्रीमती अंकिता विधाते :१६ महिण्यात खड्डे बुजविले नाही आकाशवाणी सिग्नल जवळ जालना रोडला लागून मोठा खड्डा पडला अपघात होत आहे नागरीक आम्हाला विचारणा करतात चर्चा होऊनही प्रश्न सुटत नाही.प्रशासनाने शहरातील सर्व समस्या बाबत दखल घ्यावी.

श्रीमती मनीषा लोखंडे :वार्ड १६ मध्ये रस्ते ऐवजी खड्डेच जास्त दिसतात वारंवार सुचना देऊनही काम होत नाही वार्डातील नागरीकांना सोबत घेऊन स्व:खर्चाने मुरूम टाकला.

श्रीमती जयश्री कुलकर्णी:वार्ड ७७ मध्ये दीड वर्षापूर्वी निष्कृष्ट दर्जाचे डांबर रस्ते झाले असल्याने रस्ता खराब झाला चौकशी करावी.संबधीत ठेकेदारावर कार्यवाही करून रस्त्याचे पुन्हा काम करून घ्यावे.तसेच हेडगेवार रूग्णालय ते गजानन महाराज मंदीर चौक शास्त्रीनगर ते मारोती मंदीर रस्त्याचे पॅचवर्क करावे.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर:शहरातील खड्डे बुजवले जात नाही त्यामूळे मनपाची प्रतिमा मलीन होत आहे. वार्डात मोठमोठे खड्डे झाले. माहिती देऊनही कार्यवाही होत नाही.

श्रीमती अर्चना निलकंठ :अमरप्रीत हॉटेल ते एकता चौक ,श्रीकृष्णनगर ते चाणक्यपूरी पर्यतच्या रस्त्यावर खड्डे आहे. वार्डातील रस्ते खराब आहे. ९९ टक्के नागरीक कर भरणा करतात.परंतु सुविधा नाही.

श्रीमती सीमा खरात : दीड वर्षात कोणतेच विकास कामे झाली नाही. एन-१२ येथील मनपा शाळा व गोदावरी शाळेच्या मधील रस्त्याची विदयुत लाईट बंद आहे बाजूलाच मेघावाले हॉल आहे त्या हॉलच्या संरक्षीत भिंती पडल्या. एन-१२ डी २४/१६ श्री.देवराव पाटील यांचे घरापासून ते मारोती पाटील यांचे घरापर्यत रस्ता खराब झाला. वार्डातील असलेल्या समस्या बाबत मी फोटो देत आहे. माहिती देऊनही तेथील काम होत नसेल तर संबधीत जे असतील कार्यवाही करावी.

कु.सायली जमादार :सातारा देवळाई भागात विकास काम होत नाही नुसते खड्डे बुजविले जात नसेल तर इतर विकास कामे कधी होणार आहे. दरवर्षी मुरूम टाकणे नंतर तो वाहून जातो हा तात्पुरता उपाय होतो कायमस्वरूपी उपाययोजना करावी.जे की वारंवार रस्त्याचे खड्डे बुजविण्यासाठी दरवर्षी निधी खर्च करण्याची गरज पडणार नाही माझ्या माहिती प्रमाणे पाच वर्षात ५०.०५ कोटी मुरूम टाकण्यावर खर्च होतो .पुर्ण पैसा वाया जात आहे वारंवार काम करावे लागणार नाही यासाठी कायमस्वरूपी तोडगा काढावा.त्यानुसार कामे करावी.

श्रीमती शोभा बुरांडे :खड्डे बुजवित नाही पाण्याची , लाईटची ड्रेनजच्या अनेक समस्या एकही काम होत नाही.गणपती उत्सव आला कामे होणार की नाही.देवानगरीकडे जाणारा पुल खराब झाला.तेथे रस्त्यावरील खड्डे बुजविले जात नाही.

श्रीमती सुरेखा सानप :नारेगाव येथील मनपाच्या शाळेच्या मैदानात मुरूम टाकला नाही शाळेत प्रार्थना चिखलात उभे राहून करावी लागते उत्तरानगरी भागात मोठे खड्डे पडले. लिगल वसाहत असतांना तेथे रस्ता नाही.नागरीक कर भरतात त्यानुसार तेथे कामे करावीत.

मा.महापौर :सभेमध्ये जे जे स.सदस्य समस्या मांडत आहे त्या संबधीत अधिकारी यांनी नोंद घ्यावी व कार्यवाही करावी.

श्री.जफर शेख :अधिकारी यांना मा.आयुक्त ,मा.महापौर , मा.उपमहापौर यांनी कुणीही आदेश केले सुचना केल्या तरी कामाची अमलबजावणी होत नाही.हे जेवढे अधिकारी बसले त्यांची गेंडया प्रमाणे जाड चमडी झाली कोणतेही काम करीत नाही.हे योग्य नाही.

मा.आयुक्त :स.सदस्य जे बोलले आहे ते शब्द मी ऐकणार नाही.

या वेळी मा.आयुक्त यांचेसह सर्व अधिकारी सभागृहा बाहेर निघून जातात.---(वेळ ११.४० वा.)

यानंतर सभागृहात प्रशासनाचा धिक्कार असो अशा घोषणा होतात.

श्री.राजू शिंदे :यापेक्षा बेहत्त्तर शब्द आम्हाला नागरीकांचे ऐकावे लागतात. अधिकारी यांना शिस्त लावून काम करून घेणे हे प्रशासनाचे काम असते तेच अधिकारी यांना सभागृहातून घेऊन जात असेल तर योग्य नाही.एवढे वाईट वाटत असेल तर आताच ठराव घ्या यांना परत शासनाकडे पाठवा.

श्रीमती सीमा खरात :अधिकारी काम करीत नाही म्हणून सदस्य चिडतात.असे बोलण्याची वेळ येते.

श्री.दिलीप थोरात :सदस्य बोलण्याची एवढे वाईट वाटत असेल तर मा.आयुक्तांनी येथून बदली करावी आम्हाला गरज नाही. अशा पध्दतीने सभागृह सोडून जात असेल तर याचे बाबत ठराव घेवून कार्यवाही करायला पाहिजे.

श्री.राजू शिंदे :प्रशासनाकडे कामा बाबत नियोजन नाही म्हणून पळ काढला मा.आयुक्ताच्या इशारावर अधिकारी गेले. हा मा.आयुक्तांचा हेतू चांगला नाही.आम्हाला बोलण्याची संधी दयायला पाहिजे त्यावर प्रशासनाने म्हणणे मांडायला पाहिजे होते.

श्री.रामेश्वर भादवे :सभागृहाचा अपमान झालेला आहे प्रशासनावर हक्कभंगाची कार्यवाही करावी.

मा.महापौर :महत्वाच्या विषयावर सभा आयोजन केले गेल्या १६-१७ महिण्यापासून विकास कामाच्या विषयावर सदस्य मत माडंतात की कामे होत नाही. जो प्रकार आताच झाला हे धोरण प्रशासनाचे बरोबर नाही. मा.आयुक्त त्यांचेसह अधिकारी यांना बाहेर घेऊन जाणे हा सभागृहाचा अपमान आहे.

श्री.राजू शिंदे :सर्व अधिकारी यांना बाहेर चला असा इशारा देऊन मा.आयुक्त निघुन गेले हे लक्षण चागंले नाही.हा महासभेचा अपमान आहे.

श्री.भगवान घडमोडे :सदस्य प्रश्न मांडत होते आयुक्तांनी चुकीची भुमिका घेतली अधिकारी गेले मा.महापौर यांची परवानगी घेतली नाही.सदस्या प्रमाणेच मा. आयुक्त हे सभागृहाचे एक सदस्य असतात विना परवानगी सभागृह सोडून गेले कार्यवाही करावी.

श्री.अफसर खान :सदस्य जे बोलले त्यात अधिकारी यांचेवर मोठा आरोप केला असे काहीही नाही. सांगून सुध्दा कामे करीत नाही असे सदस्यांचे म्हणणे होते सभेचे अध्यक्ष महापौर असतात विचारणा करून अधिकारी यांनी बाहेर जायला पाहिजे होते. सदस्यांचे प्रश्न ऐकण्यासाठी आयुक्त सभागृहात असतात.आयुक्त,अधिकारी निघून गेले हा आमचा अपमान मा.आयुक्तांनी माफी मागावी.

श्री.राजू शिंदे :प्रश्न मांडतो त्यांची नोंद अधिकारी घेत नव्हते मा.महापौरांनी सुचना केल्यानंतर नोंदी घेणे सुरू केले याचा अर्थ अधिकारी किती महत्व देतात यांची चमडी किती जाड आहे असे सदस्यांचे म्हणणे होते.ज्या पध्दतीने मा.आयुक्त निघून गेले ते योग्य नाही.कोणताही निर्णय आयुक्त स्वत:च्या मनाने घेता येत नाही. अधिकारी पदाधिकारी हे मनपाचे दोन चाके असतात प्रशासनास मदत करण्यास तयार आहोत. आर्थीक परीस्थिती सुधारण्यासाठी प्रशासनाने काय प्रयत्न केले आम्ही वसुली करण्यास आड येत नाही ,अतिक्रमण काढावे सुविधा दयाव्यात मागणी करतो.खड्डेचे संदर्भात पेपरला बातम्या यात मनपाची बदनामी होते विकास कामे करण्याचे प्रशासनाने काय प्लॅर्नीग केले. आयुक्त निघून गेले हा सभागृहाचा व १६ लक्ष जनतेचा अपमान आहे. ६७(३) सी मध्ये अधिकार

नसतांना पैसे दिले जाते  खड्डे बुजविणेसाठी हे कलम का वापरले जात नाही प्रशासनाने माफी मागावी ,अधिकारी विना परवानगी निघून गेले त्यांचेवरही कार्यवाही करावी.

श्री.नंदकुमार घोडेले :प्रशासन उत्तर देण्यास सक्षम नाही म्हणून पळ काढला असावा ३१ तारखेच्या बैठकीत अतिक्रमणा विषयी सुचना दिल्या  कार्यवाही केली नाही.कर वसुली होत नाही मालमत्ताचे सर्वेक्षण करण्याचे टेंडर ७-८ महिण्यापासून पडून आहे वसुली करीत नाही  त्याचा रोष आपल्यावर येतो ३० कलमी कार्यक्रम उत्पन्न वाढविण्याचा दृष्टीने प्रशासनाला दिले अंमलबजावणी नाही .पाणीपुरवठा विस्कळीत आहे स्वच्छता नाही. खड्डे असे महत्वाचा विषय आजचे होते सभागृहाला उत्तर देणे ऐवजी  पळ काढणे योग्य नाही.

श्री.गंगाधर ढगे :आठ दिवसात खड्डे बुजविणार होते कार्यवाही केली नाही.

श्री.जफर शेख पुन्हा सांगतो की अधिका-यांची जमडी गेंडया पेक्षा जाड झाली कामे करीत नाही. नागरीक आम्हाला शिव्या देतात ते जे बोलतात तेच प्रशासनाला बोललो एवढे वाईट वाटून घेण्याची गरज नव्हती.आयुक्ताच्या सांगण्यावरून अधिकारी निघूत जात असेल तर योग्य नाही अशा प्रशासनाची गरज नाही अधिकारी यांनी बाहेर जातांना मा.महापौरांना विचारणा केली नाही.शहराचा सभागृहाचा अपमान झाला आयुक्त व अधिकारी यांनी सभागृहाची माफी मागावी. अधिकारी फोन उचलत नाही. मा.आयुक्त मा.महापौर यांनी आदेश केल्यानंतरही अधिकारी काम करीत नाही.

श्री.गंगाधर ढगे :सर्व वार्डाचे प्रश्न आज होणार होते भुमीगत गटार योजनेचे काम करीत असतांना अनेक रस्ते खोदून ठेवले  खड्डे पडत आहे. अपघात होत आहे आता पावसाळा सुरू आहे त्या खड्डयात पाणी साचत आहे किमान दोन महिने काम भुमिगत गटार योजनेचे  थांबवावे.

श्री.भाऊसाहेब जगताप :मा.आयुक्त व त्यांचे इशारावर अधिकारी निघून जात असेल तर या घटनेचा निषेध करतो  भु.गटार योजनेच्या कामामूळे रस्त्यावर मोठे खड्डे पडत आहे मुकुंदवाडी विमानतळ भिंतीलगत रस्त्यावर खड्डे पायी चालता येत नाही.ड्रेनेज लाईनचे काम होत नाही लाईट बंद तरीही ठेकेदार बील उचलता.जे उत्सव येतील त्यापुर्वी सर्व विकास कामे करावी.मा.आयुक्तानी ठोस निर्णय घेतला नाही.मुरूम टाकणार होते काम होत नाही.आपले म्हणणे न ऐकता सभागृहातून मा.आयुक्त व  अधिकारी  यांनी निघून जाणे कायद्यानुसार बरोबर नाही कार्यवाही करावी.

श्री.अजीम अहेमद :वार्डात ४ महिन्यापासून घाण पाणी येते कार्यवाही होत नाही. जी हरकत अधिकारी यांनी केली कार्यवाही करावी जे की यापूढे असा प्रकार होणार नाही.

श्री.जागीरदार अयुब :मा.आयुक्त हे अधिकारी यांचेसह निघून गेले सभागृहाचा अवमान केला प्रशासन व पदाधिकारी हे गाडीचे दोन चाके असतात. बरोबर राहून काम होणे आवश्यक आहे मा.आयुक्त हे जनतेचे नोकर महान सेवक असतात त्यांनी त्याची नोकरी इमानदारी व चांगल्या पध्दतीने निभावली पाहिजे.सभागृह सोडून बाहेर जाणे हे लक्षण प्रशासनाचे बरोबर नाही.आयुक्तांनी सर्व अधिकारी यांना सोबत घेऊन काम करावे अधिकारी यांनी विना परवानगी सभागृह सोडले. मोठी चूक केली

माफी मागत नाही तोपर्यत यांना माफ करू नये. चमडी मोठी झाली हे शब्द कहावत आहे ही शिवी नाही. राग येण्याचे कारण नाही.पावसाळा पुर्ण होत आला तरी कामे होत नाही. हे धोरण बरोबर नाही.

श्री.कैलास गायकवाड :आजची सभा महत्वाची होती.सदस्य जे बोलले ते योग्य होते. १५-१६ महिण्यात रस्त्याची ड्रेनेजची विदयुतची पाणीप्रश्न बाबतची कामे झाली नाही.वसुली संदर्भात आपण बैठक घेतली २ -३ महिण्यात वसुली नाही. अनेक प्रश्न आज विचारणा होतील म्हणून प्रशासनाने वेळकाढू पणा केला निघून गेले.नागरीक आम्हाला बोलतात चुक कोणाची होती मिडीयाने सुध्दा दोन्ही बाजूने पेपरला बातम्या दिल्या पाहिजे. अधिकारीही मा.आयुक्ता बरोबर निघुन गेले मी निषेध करतो स.सदस्य श्री. जफर खान यांचे वार्डात एका ठिकाणी ड्रेनेजची मोठी समस्या निर्माण झाली तेथे नागरीकांनी घरे बांधली ड्रेनेजचे पाणी रस्त्यावर येते दुर्गधी पसरली नागरीक आजारी पडतात अतिक्रमण विभागाकडे तक्रार केली दखल घेतली जात नाही.

श्री.राजगौरव वानखेडे :मा.आयुक्त ,अधिकारी विना परवानगी सभागृहातून निघुन गेले त्याबध्दल निषेध करतो आयुक्तांना येऊन सहा महिने झाले ठोस निर्णय घेतले नाही प्रशासनाचे आदेश पालन अधिकारी करीत नाही प्रत्येक वेळेस अधिकारी यांची बदली केली जाते. वार्डात ५-५ लक्षची मुरूम टाकण्याचे काम शॉर्ट टेंडर काढून खड्डे बुजविण्याचे आदेश केले कामे होत नाही तातडीचे काम म्हणून आयुक्तांना मंजूरी देण्याचे अधिकार आहे. ६७-३ सी मध्ये अधिकारी यांचा पगार दिला जातो. तर तातडीचे कामे का होत नाही.प्रशासनाचा जास्त वेळ बैठकीमध्येच गेला विकास कामे काहीच नाही ३६(३) नुसार आयुक्तांच्या बाबतीत निर्णय घ्यावा.

मा.उपमहापौर :डांबर प्लॅन्ट मध्ये महापालिकेचे पैसे वाचणार होते म्हणून तत्कालीन आयुक्त श्री.केंद्रेकर यांनी आणला त्यास मान्यता दिली.त्यानंतर नवीन मा.आयुक्त आले तो डांबर प्लॅन करायचा नाही ५०-५० लक्षची कामे करायचे ठरविले आयुक्त बदलले तर त्यांची भुमिका बदलते का किंवा आधीचे आयुक्त यांची भुमिका चूक होती का सभागृहाने कुणाचे ऐकायचे, एलईडी लाईटच्या संदर्भातही महापालिकेची नाचक्की झाली. ५० लक्षची कामे दिली त्यास सभेने मान्यता दिली नाही असे प्रशासन सांगते जानेवारी पासून खड्डे बुजविण्याचे आम्ही बोलतो. ६७-३ सी मध्ये अधिकारी यांचे पगार काढले जातात अपघाताने दररोज लोक मरतात खड्डे बुजविण्यासाठी ६७-३-सीचा वापर आयुक्त का करीत नाही. चार दिवसापुर्वी ड्रेनेज लाईन श्री. घुले नावाच्या व्यक्तीचा गुदमरून मृत्यू झाला त्यांना मदत करण्याकरीता सभा मान्य करेल तेंव्हा मदत देऊ असे प्रशासन का सांगते अशा वेळी ६७-३-सीचा वापर का होत नाही.

मा.महापौर :डांबर प्लॅन्ट विषयाला मान्यता दिली कार्यवाही केली नाही ५०-५० हजाराची वार्डात कामे करणार होते मुरूम टाकण्या बाबत टेंडर काढावे सहा महिन्यापासून सुचना करतो टेंडर निघाले नाही खड्डे बुजविले नाही एक आयुक्त प्रस्ताव आणतात दुसरे तो रद्य करतात या सभागृहाने कोणत्या आयुक्तांची

भुमिका योग्य ठरवायची असा प्रश्न पडतो.प्रशासनाने आवश्यक ती सर्व कामे वेळीच केली पाहिजे.

श्रीमती माधुरी देशमुख :या सभागृहाचे सर्वोच्च स्थान मा.महापौर असतांना सभागृहाची परवानगी न घेता मा.आयुक्त व सर्व अधिकारी निघुन जाणे योग्य नाही सभागृहाचा व मा.महापौरांचा अपमान केला त्याबध्दल निषेध करते. मा.आयुक्तांनी अर्धा तासाच्या आत माफी मागावी तशी अवमानाची नोटीस देऊन कळवावे नसता आवश्यक त्या कार्यवाहीस सामोरे जावे लागेल. असे कळवावे सभागृह सोडून जाणे यात मा.आयुक्त, अधिकारी यांचे हे ल क्षण बरोबर नाही. वार्डातील रस्ते चांगले तुमचा सत्कार करायचा अशी नागरीक आमची दिल्लगी करतात. सदस्य बोलले असेल परंतु आयुक्तांना त्यांचे मत माडण्याची मुभा आहे. अपमान करून निघुन जाणे यास घटनेत परवानगी नाही. मी प्रश्न दिला सदस्यांनी काय काम केले पाहिजे. नगरसेवक शब्द कोठून आला स.सदस्य लोकप्रतिनिधी आहे परंतु सदस्यांना सेवक करून टाकले नागरीकाचे बोलणे टोमने ऐकायला मोकळे सोडले काय? अधिकारी काम करणार नाही कामे होत नाही म्हणून सदस्य कार्यालयात संचिकेच्या मागे फिरतात त्यांना चोर ठरवले जात आहे. कोणतेही काम होत नाही. विकास कामाची प्रशासनाला मधुर फळे येणे शक्य नाही. असे वाटायला लागले आहे.

श्री.रामेश्वर भादवे :गांधीनगर नाल्यावरील अतिक्रमण दोन दिवसात काढणार होते कार्यवाही केली नाही. खड्डे बुजविले जात नाही संबधीत अधिकारी यांचेवर कार्यवाही करावी. मा.महापौर यांची परवानगी न घेता मा.आयुक्त अधिकारी सभागृहातून निघून गेले त्यांनी माफी मागावी.

श्री.राजू शिंदे :पेपरला बातमी होती की बैठकीत सदस्य खड्डेविषयी बोलले नाही. त्यानुसार ४ स्थायी समितीच्या सदस्यांनी ही सभा बोलविण्याची शिफारस केली त्यानुसार आजची सभा आयोजित केली जे प्रश्न उपस्थित होणार त्याचे उत्तरे आजच्या सभेत मिळणार होते महापालिकेच्या इतिहासात व शहरातील नागरीकांसाठी हा काळा दिवस असे म्हणावे लागेल. यापुर्वी मा.आयुक्त सर्व अधिकारी बाहेर निघून गेले असे कधीच झाले नाही. सभागृहाचे काही नियम असतात अधिकारी यांना सभागृहात येतांना व जातांना मा.महापौरांची परवानगी घ्यावी लागते. मा.आयुक्त यांनी जेथे ६७-३ सी चा वापर होऊ नये तिथे वापर करतात. जेथे गरज आहे तेथे वापर करीत नाही. ३६-३ सी कलम वापर करून कार्यवाही करावी. (कलम वाचून दाखवतात) जे की मा.आयुक्तांनी या सभेचा अपमान केला कर्तव्यात कसूर केला एलईडीच्या प्रकणात मा.आुयक्तांवर मा.सर्वोच्च न्यायालयाने तासेरे ओढले आहे. प्रशासनाने कोर्टात पाहिजे तशी बाजू मांडली नाही. सभागृहाला विश्वासात न घेता रात्री तीन वाजता त्या एजन्सीला वर्कऑर्डर दिली जाते. हे बरोबर नाही. शहरात खड्डे बुजविले जात नाही प्रशासनाकडे उत्त्तर नव्हते म्हणून पळ काढला डांबर प्लॅन्ट रद्द केला श्री.केंद्रेकर साहेब चार महिने होते चांगले काम केले म्हणून त्यांचे अभिनंदन सुध्दा केले होते.

मा.महापौर :दरवर्षी ४-५ कोटी खड्डे बुजविण्यात खर्च होतो त्यामूळे त्यांनी डांबर प्लॅन्ट प्रस्ताव आलेला होता.

श्री.राजू शिंदे :डांबर प्लॅन्ट चालू केला असता तर दर वर्षी महापालिकेचे पैसे वाचले असते दुकानदारी बंद होऊ नये म्हणून प्रशासनाने विरोध केला काय. प्रशासकीय काम करीत असतांना मा.आयुक्तांनी इतर अधिकाऱ्यावर नियंत्रण ठेवणे आवश्यक असते समांतर बाबत मा.कोर्टाने आता तारीख दिली त्या प्रकरणात मोठा भष्ट्राचार झाला. प्रशासनाने वेळ दिली ते समोर येणार होते म्हणून पळ काढला. सभागृह सोडून जाणे हे लक्षण योग्य नाही. १६ लक्ष जनतेच्या भावना दुखावलेल्या आहे. सदस्य वाईट बोलले तर आयुक्तांनी मा.महापौरांशी चर्चा करायला पाहिजे होती परंतु सभा होऊ दयायची नव्हती हे कारण त्यामागे असावे नागरीकांना वेठीस धरणारे हे अधिकारी आहे त्यामूळे ३६-३ नुसार कार्यवाही करावी.

श्रीमती सायरा बानो :मा.आयुक्तांनी मा.महापौर यांची परवानगी न घेता सभागृह सोडणे योग्य नाही.. ड्रेनेज लाईन, पाईप टाकू असे आश्वासन दिले. खड्डे संदर्भात ३५० तक्रारी, लाईट बंद, ड्रेनेजची कामे होत नाही, नाले साफ होत नाही, प्रत्येक वार्डसाठी ५ लक्ष चे टेंडर करून मुरूम टाकणार होते ते ही काम होत नाही चेलीपुरा ते काचीवाडा भागातून चार प्रभागातून नाला वाहतो साफसफाई होत नाही.११३ मोठे खड्डे आहे. रमजान ईदच्या पहिले खड्डे बुजविले नाही आता गणपती उत्सव येत आहे. कोणतेही काम होत नाही.

श्री.जमीर कादरी :प्रशासन व लोकप्रतिनिधी मिळून काम केले तर विकास होईल मा.आयुक्ता बरोबर अधिकारी निघून गेले. या सभेचे पिठासीन अधिकारी महापौर आहे परवानगी न घेता अधिकारी बाहेर जाणे योग्य नाही.

श्री.जागीरदार अयुब :सदस्य जे बोलले मा.आयुक्तांना वाईट वाटले असेल तर नियमानुसार त्या सदस्यांना नोटीस देऊन खुलासा मागवू शकत होते त्यानुसार योग्य निर्णय घेता आला असता.

श्री.गजानन बारवाल :सभेचे पिठासीन अधिकारी महापौर असतात.सर्वांनी सभेच्या नियमाचे पालन करणे आवश्यक आहे त्यात आयुक्तही एक सदस्य म्हणून असतात.महत्वाचे विषयावर चर्चा करणार होतो तीन महिन्यात मा.महापौर यांनी ज्या समस्या असतील त्या विषयी बैठका घेतल्या तेथे प्रशासन उपस्थित नव्हते मा.आयुक्त यांनी सभागृह सोडले सभागृहाचा अवमान केला सदस्य बोलले त्यांचा अपमान करण्याचा हेतू नव्हता शब्द परत घेतले असते.सदस्य हे मा.महापौरांना बोलतात महापौर हे आयुक्तांना सुचना केल्यानंतर खुलासा होतो परंतु डायरेक्ट मा.आयुक्तांनी सदस्यांचे शब्द विचारात घेऊन येथून पळ काढला जो प्रकार झाला त्या संदर्भात मा.मुख्यमंत्री महोदय मा.पालकमंत्री महोदय मा.विभगीय आयुक्त यांना तसे कळविण्यात यावे व कार्यवाही करावी.

श्री.इरशाद खान :दीड वर्षात कोणतेही काम होत नाही अधिकारी काम करण्यास तयार नाही पाणीपुरवठा ड्रेनेज लाईन योजनेमध्ये जे अधिकारी कार्यरत आहे त्याचे पगाराच्या तुलनेत त्यांचेकडे किती मालमत्ता आहे चौकशी करावी.

श्रीमती वैशाली जाधव :वार्डात लाईट बंद आहे १ लक्ष खर्च करून स्वत: मुरूम टाकला नागरीक आमच्या घरी कामे करण्या बाबत मागणी करतात. पाण्याचे पाईप कमी पडलेले आहे ते देण्यात यावे.

श्री.भगवान घडमोडे :मा.आयुक्त येथून निघून गेले असले तरी कामकाज थांबवू नये जनतेची कामे करावी लागणार सदस्यांच्या भावना मा.आयुक्तांनी समजावून उत्तर दयायला पाहिजे होते. जो प्रसंग घडला त्या बाबत मा.विभागीय आयुक्तांशी चर्चा करावी अधिकारी मागवावा.सभेचे कामकाज चालू ठेवावे.

श्री.राजेंद्र जंजाळ :चर्चा करून निर्णय घेणे अपेक्षीत होते.जनता बोलते तेच समस्या आम्ही येथे मांडतो. स.सदस्य जे बोलले ते जनतेचे शब्द समजावे प्रशासनाचे अशा प्रकारचे धोरण असेल तर निर्णय घेण्याची वेळ आली जे धोरण प्रशासनाने स्विकारले ते राजपत्रित अधिकारी म्हणून त्यांना शोभणारे नाही जनतेची कामे होण्यासाठी ही सभा आहे. एक आयुक्त डांबर प्लॅन आणतात दुसरे रद्य करतात समांतर बाबत कार्यवाही करा आपण निर्णय घेतो तर दुसरीकडे पाणीपुरवठा कोण सांभाळणार असे उत्तर मिळते.लाईट रस्ते, कचरा संदर्भात प्रकरण न्यायालयात आहे समांतर बाबत निर्णय दिला,रस्त्याचे बाबत शपथपत्र सादर केले, राष्ट्रीय कचरा निर्मुलनाची व्यवस्था करा सांगतो कार्यवाही केली नाही याचा अर्थ मा.न्यायालयाचा आपण वेळ वाया घालतो आहोत काय? जनता माफ करणार नाही. वार्डातील समस्या बाबत प्रत्येक सदस्यांनी फोटो काढून आणले आयुक्तांना दाखविणार होतो परंतु ते सभागृहातून त्यापुर्वी निघून गेले सामान्य जनतेचे काय प्रश्न असतात मांडणार होतो त्यांचेकडे उत्तर नाही म्हणून प्रशासन निघून गेले जनतेने आम्हाला निवडून दिले पाच वर्षासाठी येथे आहोत आयुक्त ३ वर्षासाठी असतात. अधिकारी यांना आमच्या बरोबरच काम करायचे नंतर कुणीही मदतीला येणार नाही. ही विशेष सभा आहे ठराव घेता येणार नाही सभेला आता मा.आयुक्त नाही मा.विभागीय आयुक्ताकडे अधिकारी मागवावा. ३६-३ नुसार आयुक्तांच्या बाबतीत ठराव घेणेसाठी पुन्हा सभा बोलवावी आयुक्तांना शासनाकडे परत पाठवावे.जे फोटो काढून आणले ते मा.आयुक्तांच्या दालनाच्या बाहेर चिटकावे जे की समस्या काय असतात प्रशासनाला समजेल समांतर बाबत ठराव घेतला नंतर पाणीप्रश्न सुरू झाले.एलईडीचा ठराव घेतला मा.कोर्टाने तासेरे ओढले रस्त्या बाबत मा.न्यायालयात प्रकरण चालू आहे एका अधिका-या बाबत सभागृहाने ठराव सम्मत केला त्यांना रजेवर पाठविले पुन्हा सभेची मान्यता न घेताच त्यांना रूजू करून घेतले काम न करता पगार देऊन टाकला.टॅक्स बाबत उपनियम बनवून आणणार होते ते केले नाही विविध प्रकरणात चौकशी नियुक्त केली चौकशीचा अहवाल नाही एक कर्मचारी यांनी महापालिकेच्या जागेवर भिंतीचे काम केले कार्यवाही केली नाही याच जागी सदस्यांनी त्यांचे नातेवाईकानी बांधकाम अतिक्रमण केले तर लगेच ड नुसार कार्यवाही होते.जे निर्णय होतात त्याची अंमलबजावणी होत नाही लोकशाहीचा खेळ मांडतो आहोत का आमचा आवाज दाबण्याचा हा प्रकार दिसतो. नियमानुसार कार्यवाही करावी आजची सभा तहकूब करावी.

मा.उपमहापौर :आजचे सभेत महत्वाचे विषय चर्चेला होते. प्रशासन कशा पध्दतीने काम करीत आहे हे सदस्य नजरेस आणून देत होते त्याच भावनेने सदस्य बोलले की अधिका-याची कातडी जाड झाली याचा अर्थ असा की प्रशासन झोपले काम करीत नाही काम करायला पाहिजे काम करायला लावू ही आमची भुमिका होती ५-६ महिन्यापासून खड्डे बुजवित नाही एका वार्डात अडीच लक्षचे मुरूम टाकण्याचे टेंडर काढले १५ ऑगस्ट ते २३ ऑगस्ट पर्यत टेंडर मुदत होती २५ तारखेला टेंडर ओपन केले सिंगल टेंडर आले पुन्हा रिटेंडर करण्यास वेळ लागेल काम सुरू करावे निदर्शनास आणून दिले आठ दिवस ती संचिका तशीच ठेवली उशीर झाला सिंगल टेंडर आल्यामूळे ती संचिका आता गहाळ झाली असे सांगतात.या सर्व गोष्टी समजून घेवून काम व्हायला पाहिजे ६७-३ सी मध्ये वापर करून खड्डे का बुजवित नाही याचा अर्थ अधिकारी काम करीत नाही प्रशासन त्यांना सर्पोट करीत आहे. एलईडी लाईटचा प्रस्ताव प्रशासनाने ठेवला तो रद्य करायला लावला आता त्याच एजन्सीला वर्क ऑर्डर दिली मा.कोर्टाने प्रकरण फेटाळले पुढे काही ऑफ्शन नव्हते का लिगल ओपनीयन घेतले का रात्री वर्क ऑर्डर दिली जाते त्यांचे उत्तर प्रशासनाकडे नव्हते म्हणून पळ काढला समांतर बाबत निर्णय घेतला आता महापालिका काम करीत नाही जनतेला आम्हाला उत्तर दयावे लागते समांतर पाणी देणार नाही नुसते त्यांना पैसे देत राहणार योग्य नाही या गोष्टी मा.आयुक्ताच्या निदर्शनास येत नाही त्या आम्ही आणून देत असेल व प्रशासनाची ऐकण्याची तयारी नसेल तर योग्य नाही सभा तहकूब करावी मा.विभागीय आयुक्त यांचेकडून अधिकारी मागवून घ्यावे.

मा.महापौर :रस्ते, खड्े, पाणीपुरवठा, विदयुत, अतिक्रमण, वसुली संदर्भात आजची सभा आहे. सदस्यांनी आपआपली भावना व्यक्त केली.प्रशासन व लोकप्रतिनिधी ही दोन चाके आहे दोघांनी मिळून काम केले पाहिजे .१५-१६ महिन्यात विकास होत नाही अशी भुमिका सदस्यांची होती.त्याची काळजी प्रशासनाने घ्यायला पाहिजे होती. अनेकदा प्रश्न मांडतो कार्यवाही होत नाही बैठक होण्यापुर्वी प्रशासनाने आढावा बैठक घेतली पाहिजे. प्रश्न विचारतो उत्तर मिळत नाही वारवांर प्रश्न करून अधिकारी ऐकत नसतील तर योग्य नाही प्रशासनाने सकाळच्या वेळात वार्डात पाहणी केली पाहिजे.सदस्य बोलले असतील प्रशासनाने संयमाने घेतले पाहिजे. प्रशासन सांगते की, टेंडर दिले होते मान्य केले नाही. मागिल आयुक्तांनी डांबर प्लॅन करण्याचे नियोजित केले मंजूरी दिली ५ कोटी खर्च वाचणार होता.एक आयुक्त प्लॅन्ट करण्याचा प्रस्ताव देतात तर दुसरे आयुक्त नाकारतात यात सभागृहाची चुक नाही. वार्डात मुरूम टाका ४ महिन्यापासून सुचना करतो काम होत नाही ६७-३-सीचा अधिकार वापरला पाहिजे होता.संचिका गहाळ होतात अनेक जागेवर अतिक्रमण होते . एलईडीचा विषय स्थायी समिती समोर आला मंजूर केला.ज्या योजनेत पैसा वाचतो ते सभे समोर यायला पाहिजे.आम्ही प्रशासनाच्या बाजूने काम करण्याचा प्रयत्न करतो.समांतरचा विषय त्यात नागरीकांचा फायदा व महापालिकेचा पैसा वाचणार असे सांगण्यात आले मंजूरी दिली परिस्थिती बिकट झाली. खड्डे

बुजविले जात नाही लाईट बंद आहे. जनतेच्या भावना मांडतो वेळ काढण्याचे धोरण प्रशासन करीत असेल तर योग्य नाही.कर वसुली व इतर वसुलीच्या संदर्भात ३०-४० मुद्दे दिले होते उत्पन्न वाढविले नाही.गुंठेवारीत काम केले पाहिजे आताच सभागृहातून मा.आयुक्ता बरोबर अधिकारीही निघुन जातात ते जाऊ शकता का नियम काय आहे त्याप्रमाणे कार्यवाही करावी.सभागृहातून मा.आयुक्त अधिकारी निघून गेले परवानगी घेतली नाही त्यामुळे या सभागृहाचा अवमान झाला या भुमिकेचा निषेध करतो व सभा तहकूब करण्यात येते (वेळ १.३० वा तहकूब पुन्हा ५.४५ वा.सभेला सुरूवात)

या वेळी पिठासीन अधिकारी म्हणून मा.उपमहापौर श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड हे कामकाज पाहतात..

श्री.नंदकुमार घोडेले :पाणीपुरवठा ,खड्डे बुजविणे अतिक्रमण अशा महत्वाच्या विषयावर चर्चा होत असतांना मा.आयुक्त व अधिकारी सभा चालू असतांना.महापौरांची परवानगी न घेता निघून गेले.त्यांनी सभेला उपस्थित राहणे आवश्यक होते का सभा कामकाज नियमावलीत काय तरतूद आहे उपस्थित नसेल तर कोणत्यानियमानुसार काय कार्यवाही करण्याची तरतूद आहे.

नगरसचिव :सभा तहकूबीनंतर सभेचे आयोजन केल्यानंतर उपस्थित राहणे आवश्यक आहे.नियम एक फ नुसार गणपुर्ती अभावी सभा तहकूब केल्यास

श्री.नंदकुमार घोडेले :सभा तहकूब केली व पुन्हा कधी सुरू करावी ते विचारले नाही सभा सुरू असतांना मा.आयुक्त अधिकारी सभागृह सोडून निघुन गेले मा.महापौर हे सभागृहाचे सर्वोच्च असतात सभा सुरू असतांना असे वर्तन केले तर काय तरतूद आहे.उपस्थित राहणे आवश्यक आहे काय नसेल तर काय कार्यवाही करता येते.

नगरसचिव :प्रश्नामध्ये दिले उत्तर देण्यासाठी मा.आयुक्तांनी थांबले पाहिजे.अध्यक्षस्थायी असलेल्या प्राधिका-यांने अन्यथा निर्देश दिला नसेल तर महापालिकेच्या सभेत प्रत्येक प्रश्नाचे उत्तर आयुक्तांनी दिले पाहिजे.नियम ५ मध्ये ४ क्रमांकावर नमूद आहे त्यामूळे आयुक्तांनी सभेला उपस्थित असले पाहिजे.

श्री.दिलीप थोरात :प्रश्न, विषयावर चर्चा चालू होती अशा वेळी आयुक्त उपस्थित नव्हते काय कार्यवाही करता येते.

नगरसचिव :सभेचे कामकाज ४३ मध्ये महानगरपालिका स्थायी समिती उपसमित्या परिवहन समिती परिवहन समितीच्या उपसमित्या विशेष समित्या व तदर्थ समित्या यांच्या सभा नियमाद्वारे विहित करण्यात येईल अशा रीतीने भरवण्यात येतील व त्यांच्या पुढील कामकाज त्याच रीतीने उरकण्यात येईल असे आहे परंतु कलम ५ पोट कलम २ च्या खंड ब अन्वये नामनिदेर्शित केलेल्या पालिका सदस्यांना हा अधिनियम व अनुसूची यात काहीही अंतभूत केलेले असले तरी महानगरपालिकेच्या कोणत्याही सभेत मत देण्याचा हक्क असणार नाही असे आहे.तसेच आयुक्तांस किंवा आयुक्तांच्या वतीने उपस्थित असलेल्या उपआयुक्त दर्जाच्या कमी दर्जाचा नसलेल्या अधिका-यास महापालिकेच्या अथवा समितीच्या कोणत्याही सभेत चर्चेत भाग घेण्याचा अन्यथा सहभाग घेण्याचा सभेच्या पिठासीन अधिकारी यांचे ------

श्री.दिलीप थोरात :सभा कामकाज नियमावली काढा त्यात असेल ते सांगावे. चुकीची माहिती देऊ नये.

नगरसचिव :विधी सल्लागार यांचेकडून अभिप्राय घेणे आवश्यक वाटते.

श्री.दिलीप थोरात :सभेतील प्रश्नाचे उत्तर देणे आयुक्तांना बंधनकारक असतांना विना परवानगी सभागृहातून निघून जाणे म्हणजे नियमाचा त्यांनी भंग केला तसा शासनाला अहवाल पाठवून जी कार्यवाही करता येईल ती करण्याबाबत शिफारस करावी.

श्री.राजू शिंदे :चर्चा करून निर्णय घेता आला असता सभागृह सोडून जाण्याची गरज नव्हती जी भुमिका आयुक्तांनी घेतली ती बरोबर नाही मा.महापौर, नगरसचिव यांनी सभेला उपस्थित राहण्या बाबत कळविले तरीही आयुक्त उपस्थित नाही या बाबत मा.मुख्यमंत्री महोदय,विभागीय आयुक्त यांना कळविण्यात यावे अधिकारीही निघुन गेले सर्व दालने बंद करून चाव्या ताब्यात घ्याव्यात.लाल दिवा अंबर दिव्याची गाडी कुणी वापरावी शासनाचे नियम आहे मा.आयुक्त दिवा असलेले वाहन ते वाहन अग्निशमन विभागासाठी आहे. लॉकबुक नोंद करतांना कोणती नोंद होते नियमानुसार हे वाहन आयुक्तांना वापरता येते का जर आपतकालीन परीस्थिती निर्माण झाली तर तेथे आयुक्त आग बूजवतील का पाण्यात उडी मारतील का? माझ्या मते मा.आयुक्त नियमाचा भंग करीत आहे.त्या वाहनाचे लॉकबुक मागविण्यात यावे. कोणत्या विभागाच्या नावाने नोंद होते.लॉकबुकवर सही कोण करते. सर्व माहिती घेऊन कार्यवाही करण्याचे आदेशीत करावे.

नगरसचिव :माहिती घेऊन देण्यात येईल.

श्री.भगवान घडमोडे :लाल दिवा अंबर दिवा चे वाहन कुणाला वापरता येते नियमात काय आहे माझे मते मा.महापौरांना ही असे वाहन असायला पाहिजे मा. सर्वोच्च न्यायालयाने या बाबत काही निर्बंध घालून दिलेले आहे त्यानुसार आयुक्त गाडी वापरता ते योग्य व नियमाला धरून आहे का ?

श्री.राजेंद्र जंजाळ :विशेष सभा होती प्रशासनाकडून खुलासा अपेक्षीत होता.प्रशासनाकडे उत्तर नव्हते म्हणून पळ काढला महानगरपालिका अधिनिमय ७२-३ मध्ये दिले की कोणत्या अधिकारी कर्मचारी यांचेकडून कर्तव्य पालनात झालेली कसूर संबधीत सक्षम प्राधिकारी यांचे लक्षात आल्यानंतर अशा अधिकारी किंवा कर्मचारी यांचे सेवा पुस्ताकात तशी नोंद करणे किंवा शिस्तभंगाची कार्यवाही करणे असे आहे.त्यामुळे सभागृहात प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी कुणीही नव्हते याचा अर्थ अधिकारी यांनी त्यांचे कर्तव्यात कसूर केला त्यामूळे त्यांचे सेवा पुस्ताकात आजच्या घटनेची नोंद करावी व ७२-३ नुसार शिस्तभांगाची कार्यवाही करावी.

श्री.राजू शिंदे :उत्तर देण्यासाठी कुणीही नव्हते हक्क भंगाची कार्यवाही करावी.६७-३-सी मध्ये एका अधिका-याचा पगार काढला त्यात रिकव्हेरी निघणार असे मुख्य लेखा परीक्षक यांनी म्हटले होते.त्यासंदर्भात वसुली करण्यासाठी पत्र दयावे.

मा.महापौर :प्रशासनाकडे प्रश्नाचे उत्तर नव्हते म्हणूनच निघून गेले आताच स.सदस्य श्री. राजू शिंदे यांनी सुचना केल्यानुसार ६७-३- सी मध्ये जो पगार एका अधिका-यांचा देण्यात आला त्यानुसार ज्यांनी आदेशीत केले होते ते वसुल करण्याची

कार्यवाही करावी जे अधिकारी विना परवानगी निघून गेले `त्याचेवर शिस्तभांगाची कार्यवाही करावी.

श्री.राजू शिंदे :हक्कभंगाची कार्यवाही करावी या घटनेचा निषेध करावा तसेच सभागृहात येण्या अगोदर अधिकारी यांनी माफी मागावी. अधिकारी येण्यास तयार असतील तर बैठक चालू ठेवावी.

या वेळी अति.आयुक्त सभागृहात उपस्थित असतात.

श्री.भगवान घडमोडे :मा.आयुक्त निघून गेले सर्व नियम पायदळी तुडवले सभेचा अपमान केला आहे. शासनास अहवाल दिला पाहिजे बैठकीत अनेक विषय झाले ६७-३- सी बाबत चर्चा झाली टॅक्स बाबत अनुदान मिळविणे बाबत चर्चा केली डीपीडीसीचे अनुदान परत गेले यास जबाबदार कोण? एलईडी बाबत माहिती पेपरच्या माध्यमातून कळाली.प्रशासनाचा प्रस्ताव होता मान्य केला मा.सर्वोच्च न्यायालयात माघार घ्यावी लागली ती का घ्यावी लागली माहिती नाही.

मा.महापौर :एलईडी बाबत कायदेशीर बाबी न पाहता वर्क ऑर्डर देयाचा निर्णय का घेतला लाल दिवा अंबर दिवा असलेले वाहन कुणी वापरावे शासनाची नियमावली आहे त्या नियमाचे पालन करावे.त्याप्रमाणे त्यांना ती गाडी वापरण्यास दयावी.

श्री.दिलीप थोरात :स्थायी समितीने सर्वसाधारण सभेने टेंडर रद्द केले असतांना वर्क ऑर्डर दिली मा.न्यायालयाची दिशाभूल केली. जी वर्क ऑर्डर दिली ती योग्य आहे की अयोग्य या बाबत मा.न्यायालयास ही कळविले पाहिजे.

श्री.राजू शिंदे :अति.आयुक्त, उपआयुक्त सभेला आले बाकी अधिकारी का आले नाही.

अति.आयुक्त :१७ सप्टेंबरच्या तयारीसाठी बैठक होती तेथे गेलेलो होतो सर्वसाधारण सभेचा रिस्पेक्ट ठेवला पाहिजे त्यामुळे सभेत आलेलो आहेत.इतर अधिकारी येणार की नाही संपर्क झाला नाही.

श्री.राजू शिंदे :जो प्रकार घडला दुर्देवी आहे.जे सदस्य बोलले ते शब्द काढून टाकता आले असते यापूर्वी एक सदस्य आयुक्तांना निकम्मा असे म्हटले होते ते आयुक्त सभागृह सोडून गेले नव्हते. ते शब्द त्यावेळी कामकाजातून वगळले ६७-३ सीचा प्रश्न असेल पाणी संदर्भात असेल समांतर मध्ये ज्या ज्या अधिका-यांनी काम केले ते चुकीचे. समांतरचे कामावर १२ आयएएस अधिका-याकडून चूका झाल्या असे म्हणावे लागेल काय? केंद्र शासनाने १४३ कोटी दिले ते सुध्दा चुकीचे होते असे त्यांचे म्हणणे होते तसे शासनाकडे पाठवावे. डांबर प्लॅन्ट केला तो या आयुक्तांनी बदलून टाकला व ५०-५० लक्षचे टेंडर काढून काम करावे असे या आयुक्तांचे मत आहे. महापालिकेच्या हिताचा एकही निर्णय घेतला नाही. ६७-३ सी नुसार काम करता येते. परंतु यांनी एका अधिका-याचा पगार देणेसाठी हे कलम वापरले हे जे कुणी दोषी असेल त्यांचेकडून वसुल करावे. पदनिर्मितीचे अधिकार आयुक्तांना नसतांना ते पद निर्माण केले व त्या जागेवर नेमणुक दिली पद निर्माण करण्यास शासनाची मान्यता लागते शासनाचे अधिकार वापरले जे काम आयुक्तांनी करायला नको अशी कामे त्यांचे अधिकारात केली म्हणून तसे शासनास कळवावे व त्यांचे सेवा बुक मध्ये तशी नोंद करावी.या बाबत ठराव घेऊन शासनास पाठवावे. मा.आयुक्त हे अग्निशमन विभागाची गाडी वापरत आहे त्यास अंबर दिवा लाल दिवा आहे. असे वाहन त्यांना वापरता येत नाही.

मा.न्यायालयाचे निर्देश आहे त्यानुसार मा.न्यायालयाचा अवमान होतो आहे कार्यवाही करावी.

श्री.नंदकुमार घोडेले :आजचे महत्वाचे विषय होते चर्चा झाली नाही आयुक्त सभेला नाही. ठोस निर्णय झाला नाही. अधिकारी येतील असे वाटले होते. सभा तहकूब करावी दोन दिवसात घ्यावी.

श्री.राजेंद्र जंजाळ :आजच्या सभेतील जे विषय होते त्यावर चर्चा करून निर्णय होणे अपेक्षीत होते.आता अनेक उत्सव येत आहे. शहरात खड्डे आहे लाईट बंद आहे. ही सर्व कामे करण्यासाठी काय तयारी केली.

अति.आयुक्त :पॅचवर्क करण्याचा सुचना दिल्या तीन चार दिवसात काम होईल.

श्री.भगवान घडमोडे :प्रत्येक सभेत हा विषय येत होता गणपती उत्सव येत आहे खड्डे बुजविले असते तर सभा घेण्याची गरज नव्हती.शहरात खड्डे पडले त्यासाठीच ही सभा होती.

श्री.अय्युब जागीरदार :पावसाळया पुर्वीची खड्डे बुजवायला पाहिजे होते. दोन दिवसात काम सुरू करावे.नागरीक काम होत नाही आम्हाला शिव्या देतात.

श्री.राजू शिंदे :दोन दिवसात खड्डे बुजविण्या बाबत आदेशीत करावे.

मा.महापौर :खड्डे बुजविणे , विदयुत तसेच पाणी प्रश्न यावर चर्चा करण्यासाठीच ही सभा होती. गणपती उत्सव सुरू झाला. आता विविध उत्सव येतील परंतु मान अपमानाचे नाटक करून प्रशासनातील अधिकारी निघून गेले सभा कशासाठी होती व कोणत्या वळणावर नेली याचे प्रशासनाने गांर्भीय घेतले पाहिजे.आम्हाला जनतेची कामे करायची आहे. अधिकारी यांना शासनाने विकास करण्यासाठी पाठविले आहे गांर्भीयाने घ्यावे दोन दिवसात रस्त्यातील खड्डे बुजविण्यात यावे लाल दिवा अंबर दिवा असलेली वाहन कुणी वापरायला पाहिजे याची संबधीत अधिकारी यांनी माहिती घ्यावी चौकशी करावी व योग्य ती कार्यवाही करावी आजची सभा तहकूब करण्यात येते.

नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद

.